महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

# सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८.

# महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६.

(दिनांक २५ मे, २०१७ पर्यंत सुधारित)

## Maharashtra Act No. XVIII of 2017.

# MAHARASHTRA AADHAR (TARGETED DELIVERY OF FINANCIAL AND OTHER SUBSIDIES, BENEFITS AND SERVICES) ACT, 2016.

(*As modified upto the 25th May, 2017*)

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांनी भारतात मुद्रित केले आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री व प्रकाशने संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

२०१७

[**किंमत :** रुपये २२.००]

## सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८.

# महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्षित वितरण) अधिनियम, २०१६.

---

### अनुक्रमणिका

**उद्देशिका.**


| **कलमे.** | | **पृष्ठे** |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ . . . . . . . . | १ |
| २. | व्याख्या . . . . . . . . | १ |
| ३. | विवक्षित अर्थसहाय्य, वित्तीय लाभ व सेवा, इत्यादी मिळण्यासाठी असलेल्या आधार क्रमांकाचा पुरावा आवश्यक असणे . . | ३ |
| ४. | राज्य शासनाकडून योजना अधिसूचित करणे . . . . . . | ३ |
| ५. | केंद्रीय अधिनियमाच्या प्रकरण तीन व सहाच्या तरतुदी लागू असणे . . . . | ३ |
| ६. | हा अधिनियम इतर कोणत्याही कायद्यास पूरक असणे आणि अधिभावी नसणे . . | ३ |
| ७. | सद्‌भावनापूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण . . . . . . | ३ |
| ८. | नियम करण्याचा अधिकार . . . . . . | ३ |
| ९. | अडचणी दूर करण्याचा अधिकार . . . . . . | ४ |

# (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८.)

## महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक १६ जानेवारी २०१७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**राज्याच्या एकत्रित निधीतून ज्यांचा संपूर्ण खर्च भागविण्यात येतो असे अर्थसहाय्य, लाभ आणि सेवा यांच्या सुशासनाचा एक भाग म्हणून, महाराष्ट्र राज्यात राहणाऱ्या व्यक्तींची एकमेव ओळख म्हणून आधारचा वापर करून, त्यांचे कार्यक्षम, पारदर्शी व लक्ष्यित वितरण करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्याच्या एकत्रित निधीतून रक्कम काढून ज्यांचा संपूर्ण खर्च भागविण्यात येतो असे अर्थसहाय्य, लाभ आणि सेवा यांच्या सुशासनाचा एक भाग म्हणून, महाराष्ट्र राज्यात राहणाऱ्या व्यक्तींची एकमेव ओळख म्हणून आधारचा वापर करून, त्यांचे कार्यक्षम, पारदर्शी व लक्ष्यित वितरण करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित बाबींसाठी तरतूद करण्याकरिता एक कायदा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सदुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६, असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील, अशा दिनांकास अंमलात येईल आणि या अधिनियमाच्या वेगवेगळया तरतुदींसाठी वेगवेगळे दिनांक नियत करता येतील आणि या अधिनियमाच्या प्रारंभा बाबतच्या अशा कोणत्याही तरतुदीसंबंधीच्या कोणत्याही निर्देशाचा अर्थ हा, त्या तरतुदीच्या प्रारंभाबाबतचा तो निर्देश आहे, असा लावण्यात येईल.

व्याख्या.

**२.** (१) या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,–

(क) " आधार क्रमांक " याचा अर्थ, केंद्रीय अधिनियमाच्या कलम ३ अन्वये व्यक्तीला दिलेला ओळख क्रमांक, असा आहे ;

(ख) " राज्य शासनाचे अभिकरण " याचा अर्थ, स्थानिक संस्था आणि राज्य शासनाची मालकी आणि नियंत्रण असलेली इतर कोणतीही संस्था यांसह महाराष्ट्र राज्यात कोणत्याही केंद्रीय किंवा राज्य कायद्याद्वारे स्थापन किंवा घटित केलेले कोणतेही प्राधिकरण किंवा संस्था, असा आहे आणि त्यामध्ये, ज्यांची रचना व प्रशासन प्रामुख्याने राज्य शासनाकडून नियंत्रित केले जाते अशा संस्थांचा समावेश होतो ;

(ग) " अधिप्रमाणन " याचा अर्थ, ज्याद्वारे एखादया व्यक्तीचा आधार क्रमांक, तिच्या जनसांख्यिकीय माहिती किंवा बायोमेट्रिक माहितीसह, केंद्रीय ओळख आधारसामग्री कोषात, त्याच्या पडताळणीसाठी सादर केला जातो आणि अशा कोषाकडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे ज्याद्वारे अशा माहितीचा खरेपणा किंवा त्यातील उणिवा सत्यापित केल्या जातात, अशी प्रक्रिया, असा आहे ;

(घ) “ लाभ ” याचा अर्थ, एखाद्या व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या गटाला, रोख रकमेच्या किंवा वस्तुंच्या स्वरूपात दिलेले, कोणतेही फायदे, देणगी, बक्षीस, अनुतोष, प्रदान, असा आहे आणि त्यामध्ये, राज्य शासनाकडून वेळोवेळी, अधिसूचित करण्यात येतील असे इतर कोणतेही लाभ, यांचा अंतर्भाव होतो ;

(ङ) “ बायोमेट्रिक माहिती” याचा अर्थ, केंद्रीय अधिनियमाद्वारे विनिर्दिष्ट केलेले एखाद्या व्यक्तीचे छायाचित्र, बोटाचा ठसा, डोळ्यातील बुब्बुळाची प्रतिमा (आयरिस स्कॅन) किंवा असे इतर जैविक गुणविशेष, असा आहे ;

(च) “ केंद्रीय अधिनियम ” यांचा अर्थ, आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६, असा आहे ; २०१६ चा १८.

(छ) “ केंद्रीय ओळख आधारसामग्री कोष ” याचा अर्थ, आधार क्रमांक धारकांना देण्यात आलेल्या सर्व आधार क्रमांकांसह, अशा व्यक्तींची संबध्द जनसांख्यिकीय माहिती आणि बायोमेट्रिक माहिती किंवा त्यांच्याशी संबंधित इतर माहिती यांसह, यांचा एक किंवा अनेक ठिकाणी अंतर्भाव असलेली केंद्रीभूत आधारसामग्री, असा आहे ;

(ज) “ राज्याचा एकत्रित निधी ” याचा अर्थ, महाराष्ट्र राज्याचा एकत्रित निधी, असा आहे ;

(झ) “ जनसांख्यिकी माहिती ” यामध्ये केंद्रीय अधिनियमाच्या तरतुदींनुसार, एखाद्या व्यक्तीचे नाव, जन्म-दिनांक, पत्ता यांच्याशी संबंधित माहिती आणि इतर संबध्द माहिती, यांचा समावेश होतो, मात्र त्यात कुळ-धर्म, जात, जमात, वंश, भाषा, हक्क अभिलेख, उत्पन्न किंवा वैद्यकीय पूर्ववृत यांचा समावेश होणार नाही ;

(ञ) “ नावनोंदणी ” याचा अर्थ, केंद्रीय अधिनियमान्वये तरतूद केल्याप्रमाणे व्यक्तींना आधार क्रमांक देण्याच्या प्रयोजनार्थ, नावनोंदणी अभिकरणांनी त्या व्यक्तीची जनसांख्यिकीय व बायोमेट्रिक माहिती गोळा करण्याची प्रक्रिया, असा आहे ;

(ट) “ शासन ” किंवा “ राज्य शासन ” याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ठ) “ विहित ” याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(ड) “ सेवा ” याचा अर्थ, एखाद्या व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या गटांला कोणत्याही स्वरुपात पुरवलेल्या कोणत्याही तरतुदी, सुविधा, सेवासुविधा किंवा इतर कोणतेही सहाय्य, असा आहे आणि त्यामध्ये, राज्य शासनाकडून अधिसूचित करण्यात येतील अशा इतर सेवांचा समावेश होतो ;

(ङ) “ अर्थसहाय्य ” याचा अर्थ, एखाद्या व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या गटाला रोख रकमेच्या किंवा वस्तुंच्या स्वरुपात केलेली कोणतीही मदत, सहाय्य, अनुदान, अर्थसहाय्य, किंवा विनियोग, असा आहे आणि त्यामध्ये राज्य शासनाकडून वेळोवेळी अधिसूचित करण्यात येतील अशा इतर अर्थसहाय्यांचा समावेश होतो.

(२) या अधिनियमात वापरलेले परंतु यामध्ये वर व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, केंद्रीय अधिनियमात अनुक्रमे जे अर्थ नेमून दिले असतील, तेच अर्थ असतील.

**३.** राज्य शासनास किंवा, यथास्थिति, राज्य शासनाच्या कोणत्याही अभिकरणास, राज्याच्या एकत्रित निधीमधून किंवा त्यामधून प्राप्त होणाऱ्या त्याच्या भागामधून किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही अभिकरणाने उभारलेल्या कोणत्याही निधीमधून रक्कम काढून ज्यांचा संपूर्ण खर्च भागविला जातो असे अर्थसहाय्य, वित्तीय लाभ किंवा सेवा मिळण्यासाठीची एक अट म्हणून, एखाद्या व्यक्तीची ओळख सिध्द करण्याच्या प्रयोजनार्थ, अशा व्यक्तीचे अधिप्रमाणन करणे किंवा आधार क्रमांकाचा पुरावा सादर करणे किंवा जिला आधार क्रमांक नेमून दिलेला नसेल अशा व्यक्तींच्या बाबतीत, अशी व्यक्ती नोंदणीसाठी अर्ज केलेला असणे आवश्यक करता येईल : विवक्षित अर्थसहाय्य, वित्तीय लाभ व सेवा, इत्यादी मिळण्यासाठी असलेल्या आधार क्रमांकाचा पुरावा आवश्यक असणे.

परंतु, जर एखाद्या व्यक्तीला आधार क्रमांक नेमून दिला नसेल तर, त्या व्यक्तीला, अर्थसहाय्य, वित्तीय लाभ किंवा सेवा मिळण्यासाठी, ओळख पटविण्याच्या पर्यायी व व्यवहार्य साधनांचा वापर करण्याची संधी देण्यात येईल.

**४.** राज्य शासन, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत, आणि त्यानंतर वेळोवेळी कलम ३ अनुसार ज्यांकरिता असे अधिप्रमाणन किंवा पुरावा आवश्यक केले असेल अशा योजना, अर्थसहाय्य, वित्तीय लाभ व सेवा यांची सूची अधिसूचित करील. राज्य शासनाकडून योजना अधिसूचित करणे.

**५.** केंद्रीय अधिनियमाचे प्रकरण तीन व प्रकरण सहा यांच्या तरतुदी ह्या, या अधिनियमान्वये अधिप्रमाणन करण्यासाठी, योग्य त्या फेरफारांसह लागू होतील. केंद्रीय अधिनियमाच्या प्रकरण तीन व सहाच्या तरतुदी लागू असणे.

**६.** या अधिनियमाच्या तरतुदी ह्या, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात भर घालणाऱ्या असतील व त्याचे न्यूनीकरण करणाऱ्या नसतील. हा अधिनियम इतर कोणत्याही कायद्यास पूरक असणे आणि अधिभावी नसणे.

**७.** या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये किंवा सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे उद्देशित असलेल्या कोणत्याही कृतीबद्दल, राज्य शासन किंवा राज्य शासनाचा कोणताही अधिकारी किंवा अन्य कर्मचारी यांच्याविरुध्द कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही. सद्भावनापूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.

**८.** (१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

(२) विशेषकरुन, आणि पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणेस बाध न येता, अशा नियमात पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींची तरतूद करता येईल :—

(क) ज्यांसाठी आधार क्रमांकांचा वापर करण्यात येईल, अशी विविध प्रकारची अर्थसहाय्ये, वित्तीय लाभ, सेवा देण्याच्या किंवा ते उपलब्ध करण्याच्या प्रयोजनासाठी आणि अन्य प्रयोजनांसाठी आधार क्रमांकांचा वापर करण्याची रीत ;

(ख) नियमांद्वारे करणे आवश्यक असेल किंवा विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी किंवा ज्या बाबतीत त्या नियमान्वये कोणतीही तरतूद करावयाची असेल अशी अन्य कोणतीही बाब;

(३) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल, ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, जर त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहे सहमत होतील, आणि असा निर्णय राजपत्रात अधिसूचित करतील तर, अशी अधिसूचना **राजपत्रात** प्रसिध्द करण्यात आल्याच्या दिनांकापासून, तो नियम केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये पूर्वी करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**९** (१) या अधिनियमांच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्यासाठी आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभापासून दोन वर्षे पूर्ण झाल्यानंतर, या कलमान्वये असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) या कलमान्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, होईल तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय
  महाराष्ट्र राज्य,
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई ४०० ००४.
  दूरध्वनी : ०२२-२३६३ २६ ९३, २३६३ ०६ ९५
  २३६३ ११ ४८, २३६३ ४० ४९
- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. जवळ,
  पुणे ४११ ००१.
  दूरध्वनी : ०२०-२६१२ ५८०८, २६१२ ४७ ५९
- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
  सिव्हिल लाईन्स,
  नागपूर ४४० ००१.
  दूरध्वनी : ०७१२-२५६२ ६१५
- **सहा. संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ,
  औरंगाबाद ४३१ ००१.
  दूरध्वनी : ०२४०-२३३१ ४६८, २३३१ ५२५
- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार
  ताराबाई पार्क,
  कोल्हापूर ४१६ ००३.
  दूरध्वनी : ०२३१-२६५० ३९५, २६५० ४०२

**आणि महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**